# देगलूर महाविद्यालयात अल्पसंख्याक दिन साजरा




**देगलूर / प्रतिनिधी**

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन विभाग व संशोधन केंद्राच्यावतीने अल्पसंख्याक हक्क दिनानिमित्त अभ्यासपुरक व्याख्यान संपन्न झाले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य ए.बी. चिद्रावार तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून ॲड.एम.एम. इनामदार उपस्थित होते.

ॲड.इनामदार म्हणाले की, अल्पसंख्याक विद्यार्थ्यांनी ज्ञानाच्या माध्यमातून स्वतःमध्ये आत्मविश्वास निर्माण केला पाहीजे. त्याशिवाय समाजाच्या विकासाला दिशा मिळणार नाही. प्रारंभी डॉ.बी.आर.कत्तूरवार यांनी प्रास्ताविकात आयोजनाचे महत्त्व विषद केले. सूत्रसंचालन शाहीस्ता बागवान तर आभार जळकोटकर या विद्यार्थीनीने मानले. यावेळी प्रा.रत्नाकर लक्षटे, प्रा.व्यंकट खंदकुरे,प्रा.कोकणे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.